दूरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स : २८१९७६३६

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

# MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे-४०११०१

जा.क्र.: मनपा /पा.पु /२०९९ /2020-21 दिनांक : 24/03/2021

**प्रति,**
**मा. श्री. / श्रीम.**
**नगरसेवक / नगरसेविका**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**विषय -** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात होणाऱ्या कमी व अपुऱ्या पाणी पुरवठयाबाबत सहकार्य करणे तसेच जनजागृती करणेबाबत...

**महोदय / महोदया**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेस स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन अॅण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. कंपनीकडून दररोज 86.00 द.ल.ली. व महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाकडून 125 द.ल.ली. असा एकुण 211 द.ल.ली. पाणी पुरवठा मंजूर आहे. सध्या पाण्याची गरज 211 द.ल.ली. एवढी असून प्रत्यक्षात 180 द.ल.ली. प्राप्त होत आहे. **सध्याची पाणी पुरवठा तुट 31.00 द.ल.ली. एवढी आहे.**

सद्यस्थितीत मागील एका महिन्यापासून महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळाकडून मंजूर कोटयापेक्षा कमी पाणी पुरवठा केला जात आहे. मार्च महीन्यातील दि.09/03/2021 तारखेपासून मिरा-भाईंदर शहरास सरासरी 94 ते 95 द.ल.ली. पाणी पुरवठा होत आहे. महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळाकडून मंजूर कोट्यापेक्षा 30 द.ल.ली. दररोज मंजूर पाणी पुरवठा कमी होत आहे.

उल्हास नदी पाणी नियोजन सन 2020-21 अंतर्गत ठाणे पाटबंधारे विभागामार्फत दि.19/01/2021 पासून पाणी वापर संस्थांना पंधरा दिवसातून 1 दिवस 24 तास पाणी कपात लागू करण्यात आलेली आहे. त्यानूसार मिरा-भाईंदर शहरास होणारा पाणी पुरवठा पंधरा दिवसातून 1 दिवस (24 तासांसाठी) बंद ठेवण्यात येतो. तद्नंतर शहरामध्ये पाणी पुरवठा हा 60 ते 70 तासांवर जात असतो. सदर पुरवठा अत्यंत कमी दाबाने होत असल्याने सतत या विभागाकडे स्थानिक रहिवाशी यांच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. त्यामुळे नागरीकांच्या तीव्र रोषास सामोरे जावे लागते. **सध्या शहरास पाणी टंचाई प्रकर्षाने जाणवत आहे व उन्हाळ्यात सदर प्रश्न अत्यंत गंभीर होण्याची शक्यता आहे.**

दूरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स : २८१९७६३६

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

# MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे-४०११०१

जा.क्र.: ____________________ दिनांक : ______________

एम.आय.डी.सी. तर्फे मंजूर कोटयापैकी होणारा अत्यंत कमी पाणी पुरवठा व दर 15 दिवसांनी घेण्यात येणारा शट डाऊन यामुळे शहरातील पाणी पुरवठा विस्कळीत झालेला आहे. यामुळे शहरातील पाणी वितरणाचा कालावधी 50 ते 55 तासांवर गेलेला आहे.

मिरा-भाईंदर शहर हे पाणी पुरवठा उदचंन केंद्रापासून सुमारे 45 कि.मी. अंतरावरती असून अचानक उंदचन केंद्रात विद्युत पुरवठा खंडीत झाल्यास अथवा तांत्रिक बिघाड झाल्यास अपुरा व अनियमित पाणी पुरवठा होत असतो. तसेच मिरा-भाईंदर शहर पाणी पुरवठा स्त्रोतापासून शेवटच्या टोकाला असल्यामुळे पाणी कपातीच्या कालावधीनंतर / अचानक उद्भवलेल्या तांत्रिक बिघाडानंतरच्या दुरुस्ती नंतर पाणी सुरु झाल्यावर शहरापर्यंत पाणी पोहचण्यास सुमारे 4 ते 5 तासांचा कालावधी लागतो व त्यामुळे पाणी कपातींच्या तासांमध्ये वाढ होऊन शहरास उशीराने व अपुरा पाणी पुरवठा होतो.

मार्च-एप्रिल या महिन्यांत हिंन्दू बांधवांचा होळी व धुलिवंदन सण दि.28/03/2021 व दि.29/03/2021 रोजी, गुडीपाढवा दि.14/04/2021 रोजी, मुस्लीम बांधवांचा दि.12/04/2021 पासून रमजान सण, ख्रिश्चन बांधवांचा गुड फ्रायडे दि.02/04/2021 व इस्टर दि.04/04/2021 रोजी आहे. अशा उत्सवांवेळी पाणी ह्या मुलभूत गरजेची टंचाई भासू नये अशी सर्वांची अपेक्षा असते. पाणी पुरवठा विभागामार्फत मंजूर कोट्यानूसार पाणी उपलब्ध करून घेणेसाठी युद्धपातळीवर प्रयत्न केले जात आहेत. तथापी, मंजूर कोट्यानूसार पाणी उपलब्ध झालेले नाही.

**उपरोक्त परिस्थिती विचारात घेता तसेच 'कोविड-19 या साथरोगाचा पुन:श्च होऊ लागलेला मोठ्या प्रमाणावरील प्रादुर्भाव' या पार्श्वभूमीवर खबरदारीची उपाययोजना म्हणून शासनाच्या नियमांचे पालन करणेबाबत व पाण्याचा काटकसरीने वापर करून प्रशासनास सहकार्य करावे तसेच नागरीकांमध्ये देखील आपल्यामार्फत जनजागृती करावी, ही विनंती.**

(दिपक खांबित)
**कार्यकारी अभियंता (पा.पु.)**
मिरा-भाईंदर महानगरपालिका